आदिवासी घटक कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत योजनांचे मुल्यमापन, संनियंत्रणाकरीता निधी वितरण. (लेखाशिर्ष २२२५ एफ२८१)

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१९/ प्र.क्र.०३/ कार्यासन.६

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : **१६ ऑगस्ट, २०१९**

वाचा

1. **शासन निर्णय क्रमांकः आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२०१८/प्र.क्र.१७०/का-६, दि.१७.१२.२०१८.**
2. **शासन निर्णय क्रमांकः वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९.**
3. **अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचे पत्र, क्र.जा.क्र.२०१९/सं.न२०१८/प्र.क्र./ का.७ (२) / ३७२१, दिनांक ०३.०८.२०१९.**
4. **शासन ज्ञापन क्रमांकः आदिवासी विकास विभाग, क्र.पुनर्वि-२०१९/ प्र.क्र.८६/का-६, दि.१४.०८.२०१९.**

प्रस्तावना -

संदर्भाधीन क्र. २ येथील पत्रान्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अधिनस्त वसतीगृहांकरीता खाजगी इमारती खरेदी करण्याच्या अनुषंगाने इन्फ्रास्ट्रक्चरशी संबंधित सदरील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट, व्हॅल्युएशन व इतर अनुषंगिक खर्चासाठी रू.१००.०० लाख इतका निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-५, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण यांवरील खर्च, ०२-अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०२) जनजाती क्षेत्राबाहेरील योजना **(०२) (४२) आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत योजनांचे मुल्यमापन, संनियंत्रण व उपयोगिता तपासणे (राज्यस्तर योजना), (२२२५ एफ २८१)** या लेखाशीर्षाखाली एकूण रु. ३११४.९४ लाख इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. सदर निधीतून उपरोक्त प्रस्तावाकरीता निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अधिनस्त वसतीगृहांकरीता खाजगी इमारती खरेदी करण्याच्या अनुषंगाने सदरील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट, व्हॅल्युएशन व इतर अनुषंगिक खर्चासाठी

रू.१००.०० लाख इतका निधी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत योजनांचे मुल्यमापन, संनियंत्रण व उपयोगिता तपासणे (राज्यस्तर योजना), (२२२५ एफ२८१), २८-व्यावसायिक सेवा खाली सन २०१९-२० करीता अर्थसंकल्पित निधीतून अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे यांना वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती:-</u>

१) वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करतांना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तिय नियम तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.०८.०७.२०१९ च्या शासन परिपत्रकातील दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

२) वितरीत निधीतून करण्यात आलेले स्ट्रक्चरल ऑडीट, व्हॅल्युएशन व इतर अनुषंगिक बाबींवरील खर्च याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन ०८.०७.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकिय विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०८१४१८५०२००६२४** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Kisanrao Pawar

Digitally signed by Kiran Kisanrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68d8b19f123ba59448c0926a91296205b9a87463f831a2beea0be5cb381a34e8, serialNumber=344de3ff07b9439dd11caf728255a5eb0a0dd495ef82f989931088637d8211c0, cn=Kiran Kisanrao Pawar
Date: 2019.08.16 13:20:40 +05'30'

(किरण कि. पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

<u>प्रत</u>,-

१. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
२. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे
३. महालेखापाल (लेखापरिक्षण) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई /नागपूर.
४. मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग,नाशिक.
६. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,घोडेगाव/शहापूर.
७. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.

८. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. निवड नस्ती (का-६)